३५

गझल (अनामिका)

अनामिका तू होती जेव्हा, डोळ्यामधुनी सरले सारे -
दोन मनांचे हितगुज आले हृदयाकाशी भिडले सारे - १

चैन चावरी मने बावरी भेटीसाठी गहिवरणारी -
पापणीतल्या प्रळयामध्ये दूळा दूरी घडले सारे - २

ओठ कापरे गाल लाजरे अस्फुट गेले सांगुन काही -
मूक भावना थरथरणाऱ्या क्षणासवांनी जडले सारे - ३

जीवाशिवांच्या मखमालीवर फुलून आली सगळी गाणी -
ब्रह्मानंदी विलीन होण्या स्वरांकित ते पडले सारे - ४

आणि अचानक तुटले अंतर मिठीत विरली नाजुक नाती -
स्पर्शामध्ये गद्गद फुटले आत्म्यासंगे दडले सारे - ५

दि. २७।१।७ स्पर्शामध्ये

सहदेव मखामले.